# श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

(रजि. नं. ए.- ७०८/पुणे)

श्रीक्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

जावक क्र. २३५०/२०२५ दिनांक : १७/०८/२०२५

## जाहीर निविदा

**श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी या न्यासाच्या वतीने खालीलप्रमाणे कामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत :-**

१) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खालीलप्रमाणे विद्युतरोषणाई करणे :-
(प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)
(अ) श्री खंडोबा मुख्य मंदिर व गडकोटातील दीपमाळा व सज्जासह आतील परिसर.
(बालद्वारीमधील माईक व स्पीकर सेटसहित एक व्यक्ती कायमस्वरूपी)
(ब) रमणा डोंगर पालखी मार्ग परिसर विद्युतरोषणाई व जनरेटर व्यवस्था
(क) श्री खंडोबा मंदिर गडकोट महाद्वार पायरी मार्ग वेशी, कमानी व मंदिरे.
(ड) श्री खंडोबा मंदिर गडकोट पूर्व पायरी मार्ग.
(इ) गावामधील मुख्य मंदिरे (रोकडोबा मंदिर, दक्षिणमुखी मारुती मंदिर, छत्री मंदिर व जानुबाई मंदिर) व भक्तनिवास.
(उ) दसरा उत्सवानिमित्त लेजरद्वारे/ड्रोनद्वारे आकर्षक विद्युतरोषणाई करणे.

२) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त पूर्ण पालखी मार्ग साफसफाई, डागडुजी व दुरुस्ती करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

३) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त फटाका आतषबाजी करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

४) श्री खंडोबा मंदिराच्या दक्षिणेकडील बाजूस गटारावर सेंट्रिंग पट्ट्या चेंबर्स टाकणे. (प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

५) मर्दानी दसरा उत्सवानिमित्त पालखी सोहळ्यामधील खांदेकरी, मानकरी व खंडा स्पर्धक विजेत्यांचा सन्मान करणेसाठी सन्मानचिन्ह पुरविणे. (प्रत्यक्ष येऊन संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

६) मर्दानी दसरा उत्सवानिमित्त पालखी सोहळ्यामधील खांदेकरी, मानकरी व खंडा स्पर्धक विजेत्यांचा सन्मान करणेसाठी फेटे पुरविणे. (प्रत्यक्ष येऊन संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

७) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त फुलांची सजावट (प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.) :-
(अ) मुख्य गाभारा सजावट करणे.
(ब) मुख्य मंदिराच्या समोरील भिंतीवर फुलांचे तोरण.
(क) बालद्वारीमध्ये घटस्थापनेच्या दिवशी फुलांची सजावट.
(ख) गडकोटामधील छोट्या-छोट्या मंदिरांना तोरण व फुलांची सजावट.

८) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी वस्तू/आर्टिकल्स देणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

९) सालाबादप्रमाणे नवरात्र दसऱ्यानिमित्त गडकोट परिसरामध्ये फोटोग्राफी व व्हिडीओ शूटिंग करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

१०) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांचा सन्मान करणेसाठी गांधी टोपी - १००० नग व नॅपकिन - १०० नग पुरविणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

११) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त न्यासाच्या अधिकारी, क्लर्क यांना ऑफिशियल २ गणवेश, सुरक्षारक्षक व इतर सेवेकऱ्यांना २ खाकी गणवेश व महिला सुरक्षारक्षक व इतर महिला सेवेकरींना २ गणवेश साड्या तसेच नित्य वारकऱ्यांना प्रत्येकी १ पायजमा व १ शर्ट कापड व शिलाईसह तयार करून देणे. (प्रत्येकी २ नग शर्ट-पँट व साड्यांचे दरपत्रकाप्रमाणे टेंडर भरणे.)

१२) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ, सेवेकरी तसेच बंदोबस्तासाठी येणारे पोलिस कर्मचारी-अधिकारी व कमांडो यांचेकरिता न्यासाचे अन्नदान कक्षात भोजनाची व्यवस्था करणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

१३) सालाबादप्रमाणे दसरा उत्सवानिमित्त भाविकांना सुलभ दर्शन देणेकामी गर्दीचे व पालखी सोहळ्याचे नियोजन करणेसाठी कमांडो पुरविणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

१४) पालखी सोहळ्यामध्ये सहभागी खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ यांना पाणी बॉटल पुरविणे. (संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.)

१५) दसरा उत्सवानिमित्त भाविक-भक्तांचे स्वागत करणे व उत्सवाच्या माहितीचे फ्लेक्स छपाई करून गावातील चौकांमध्ये लावणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन निविदा भरणे.)

**नियम व अटी**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.
२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु. ५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.
३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि. १८/०८/२०२५ ते दि. २४/०८/२०२५ पर्यंत स. १० ते सायं. ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.
४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई. निविदाधारकास कळविण्यात येईल.
५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ www.khandoba.com येथे उपलब्ध आहे.
६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण**

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी
'मल्हार' भक्तनिवास (दुर्गामाता चौक),
जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे ४१२३०३

सही/-
**आशिष मारुती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

शिक्का

सही/-
**मंगेश अशोक घोणे**
प्रमुख विश्वस्त
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी